**महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांचे बदल्यांचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रत्यार्पित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मविसे १०/२०१४/प्र.क्र.२२९/आस्था-३(अ)**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१

तारीख: ४ फेब्रुवारी, २०१५

वाचा :-

१) **महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ संबंधीची अधिसूचना दिनांक २५.५.२००६**

२) **शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः एसआरव्ही-२०१४/व्हीआयपी-२८४/ प्र.क्र.३६२/१२/दिनांक २६.११.२०१४**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा दिनांक १ जुलै, २००६ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ६ नुसार महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यास विभागाचे प्रभारी मंत्री हे सक्षम प्राधिकारी आहेत. तसेच सदर कलमाच्या परंतुक २ नुसार बदली करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याला त्याचे अधिकार त्याच्या कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्याकडे सोपविता येतील अशी तरतूद करण्यांत आलेली आहे. संदर्भ क्र.२ च्या दिनांक २६.११.२०१४ च्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांनी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील कलम ६ खालील परंतूक २ व कलम ७ या मधील तरतूदी एकत्रित विचारात घेऊन बदली करण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांचे बदल्यांचे अधिकार, त्यांच्या कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्यांकडे प्रत्यार्पित करण्याची कार्यवाही त्वरित करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. त्यानुसार प्रशासनातील कालापव्यय टाळून, निर्णय प्रक्रियेतील टप्पे कमी होण्याच्या दृष्टीने तसेच गतीमान प्रशासनाच्या दृष्टीने (Good Governance) महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ६ मधील परंतुक २ नुसार महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गातील संबंधीत महसूली विभागात कार्यरत असलेल्या बदलीपात्र अधिकाऱ्यांच्या

विभागांतर्गत बदल्यांचे अधिकार संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्त यांना प्रत्यार्पित करण्यांत येत आहेत.

२) परंतु, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व (५) नुसार सदर संवर्गातील एखादया अधिकाऱ्याची प्रशासकीय कारण/विनंती या अनुषंगाने मुदतपूर्व बदली करावयाची झाल्यास असा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करावा.

३) विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब मधील बदलीपात्र अधिकाऱ्यांच्या बदल्या, बदली अधिनियम २००५ मधील तरतूदी विचारात घेऊन समुपदेशनाद्वारे कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२०४१७५४४८०१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.02.05 11:36:26 +05'30'

**(वि.गिरिराज)**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.मंत्री, ग्रामविकास व जलसंधारण विभाग
३. मा.राज्यमंत्री, ग्रामविकास विभाग
४. मा.मुख्य सचिव
५. मा. अपर मुख्य सचिव, सेवा/ सामान्य प्रशासन विभाग
६. मा.प्रधान सचिव (ग्रा.वि.व पं.रा.)

७. मा.विभागीय आयुक्त (सर्व)

८. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

९. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग

१०.निवडनस्ती आस्था ३ (अ).